## <u>नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मध्ये निशाणी क्र. २९८ कडील अर्जावर आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींचे म्हणणे घेतले आहे.

२) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादीतर्फे विद्वान वकील श्रीमती साळुंखे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकिल श्री. चिंगळे यांचा युक्तीवाद ऐकला.

३) प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते वादीला न्यायाच्या दृष्टीने या अर्जासोबतची कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देणे उचित आहे. त्यामुळे माझ्या मते कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळण्याची वादीची प्रस्तुत अर्जातील विनंती न्यायाच्या दृष्टीने मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

### <u>आदेश</u>

१. कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळण्याची वादीची प्रस्तुत अर्जातील विनंती मंजूर करण्यात येते.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.06.14 17:12:38 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः– १४/०६/२०२४      २ रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.